Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – V February 2016

# संत सोयराबाई (चोख्याची महारी)

डॉ. वेदश्री विजय थिगळे,
सदस्य : मराठी अभ्यास मंडळ, पुणे विद्यापीठ, सदस्य : मराठी विद्याशाखा, पुणे विद्यापीठ.
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख.
कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे महाविद्यालय, सिडको, नाशिक : ०८.

तेराव्या शतकातील स्त्रीजीवन, समाज, संस्कृती, तत्त्वज्ञान, देव–देवता, आचार–विचार, रूढी–परंपरा या सर्वांचे दर्शन आपल्याला संत कवयित्रींच्या काव्यातून घडते. त्यांच्या काव्यातून त्यांना अपेक्षित असलेली सात्विकता आणि सोज्वळता डोकावतांना दिसते. यातून त्यांच्या काव्याची वेगळी समीक्षा करावी असे वाटत नाही. वाड्.मय हे अपरिहार्यपणे वाड्.मयाकडे टीकात्मक दृष्टीने पाहते. त्यामुळे वाड्.मय हे समीक्षेपासून वेगळे नाही.' उदा. संत जनाबाईचे अभंग किंवा संत तुकारामांचे अभंग.

संत कवयित्रींच्या साहित्याने ' विशिष्ट मानसिकता आणि निग्रह धारण करून आत्म व लोकप्रबोधन आणि सामजिक प्रदूषण कमी करण्याचे काम केले'. जणू काही भांगाच्या शेतात यांनी आपल्या काव्याने तुळशीची रोपे लावली'. कोमलता, तीव्रता, आपुलकी आणि आपल्या सर्वस्वाचा त्याग करण्याची त्यांची वृत्ती, समर्पणाचा आगळावेगळा भाव या बाबतीत संत कवयित्री अधिक पुढारलेल्या दिसतात. कारण त्यांच्या कवितेतील मूल्यविचार आणि मूल्यव्यवस्था ही त्यांच्या समकालीन समाजातून आलेली आहे. त्यांच्या काव्यातून व्यक्त झालेली मूल्ये व्यावहारिक, पारमार्थिक आणि काही पारलौकिक स्वरूपाची आहेत.

अवघे १३वे शतक संत श्री ज्ञानदेवांच्या भागवत संप्रदायाने अन् श्री चक्रधरस्वामींच्या महानुभाव पंथाने व्यापलेले होते. हे पंथ तसे वैदिक धर्मातील दोषांच्या निराकरणासाठीच जणू काही निर्माण झालेले होते. धर्मापासून अन् भक्तीपासून वंचित झालेल्यांची अध्यात्मिक सोयच या पंथांनी केली अन् जगण्याचे एक नवे दालन या निमित्ताने उघडले असे म्हणता येईल. या पंथांनी तळा–गाळातल्या समाजाच्या अध्यात्मिक गरजासुध्दा पूर्ण केल्या. अवघा महाराष्ट्र भक्तीमय केला. जरी सभोवताली अनेक सत्तांतरे, आक्रमणे होत असली तरीही. या दोन्ही पंथांनी समाज बांधणी आणि समाज संघटन फार मोठया प्रमाणात तर केलेच पण त्याचबरोबर मराठी वाड्.मयात फार मोठया प्रमाणावर वाड्.मयीन भर घातली. नव्या रचनांचे, आशयांचे, विषयांचे वाड्.मय प्रकार यात आले.

या पंथांचे अत्यंत मोलाचे कार्य सांगावयाचे झाले तर या दोन्ही पंथांनी स्त्रियांना पंथात प्रवेश दिला. त्यामुळे अनेक स्त्रिया या अध्यात्माच्या वाटेकडे वळल्या, यातही बाल विधवांचे प्रमाण अधिक होते. महानुभाव पंथात बाईसा, महादसा, हिराईसा, उमाईसा आणि यांसारख्या अनेक संतस्त्रिया सहभागी झाल्या. ज्ञानेश्वरांच्या काळात खुद्य त्यांची बहिण लहानशी सणकांडी मुक्ताई, संत नामदेवांची शिष्या जनाबाई, संत चोखामेळयाची पत्नी सोयराबाई

अन् बहिण निर्मला, संत तुकारामांची शिष्या बहिणाई व संत रामदासांची शिष्या वेणाबाई आणि इतर काही या साऱ्या सहभागी होत्या. या काळात 'स्त्री' ही पुरूषांच्या बरोबरीने समान पातळीवर भक्ती मार्गात वाटचाल करू लागली. लेकुरवाळया विठ्ठलाच्या अंगा–खांद्यावर सर्वांना सारखे स्थान मिळाले. विठ्ठल भक्तीचा मार्ग हा सर्वांसाठी खुला आणि सोपा आहे याची त्यांना प्रचिती आली. त्यामुळेच भक्तीमुळेच भागवत संप्रदाय हा सर्वसामान्यांचा भक्ती संप्रदाय झाला.

१३ व्या शतकाचा इतिहास आणि साहित्य आपल्याला आजही आत्ममग्न करते. त्यावेळचा समाज म्हणजे अंधारात खितपत पडलेला आणि अन्यायात थिजलेला होता. यातून बाहेर पडण्यासाठी धडपडणारा होता. याकाळात युगधर्म उरात घेऊन अनेक संत जन्माला आले. धर्माला आलेली भोवळ आणि त्यामुळे मानवी मूल्यांचा सतत होणारा ऱ्हास, अनैतिकता, अत्याचार, अधर्मीय वर्तन, बोकाळलेली अंधश्रध्दा, भेदाभेद, परकीय सत्ताधीश, त्यांची धार्मिक आक्रमणे, माणसाचा सतत राक्षस होत जाणाऱ्या या समाजाला सन्मार्गाला लावण्याचा आणि अधर्म, अत्याचार थांबवण्याचा संत साहित्याने खूप प्रयत्न केला. समाजाचे संवर्धन करण्यासाठी पारंपरिक पण नवीनता धारण करणारी मूल्ये रूजविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. या मूल्यांना पचवेल अशी परिस्थिती निर्माण करण्याचा आणि तसा समाज निर्माण करण्याचा, समाजाला परमार्थाकडे वळविण्याचा आणि माणूसकीतून सामाजिक कल्याण साधण्यासाठी संतांनी स्वत: व अंभंगातून तसे प्रयत्न केलेले आहेत. या प्रयत्नांमधून सामाजिक परिवर्तनाची एक चळवळ उभी राहिली.

विश्वकल्याणाचे पसायदान मागणारे आणि लोककल्याणाची अद्‌भूत क्रांती घडविणारे सर्व संत हे खरं तर भारतीय संस्कृतीचे आधारस्तंभच आहेत. त्यांनी भारतीय समाजाचे सर्वांगिण पुनरूत्थान व्हावे यासाठी आपले जीवन व्यथित केले आहे. दया, क्षमा, शांती, सर्व भूतमात्रांप्रती प्रेम, परोपकार, ईश्वरनिष्ठा, अनन्यभक्ती, समता, बंधुता, सहिष्णुता, शुध्द आचरण, ही सारी संतांची लक्षणेच आहेत. ईश्वरनिष्ठा, गुरूभक्ती, भेदाभेद अमंगळ, स्वधर्माचरण, वर्णप्राप्त कर्म म्हणजे हीच खरी परमेश्वर पूजा, सन्यासविरोध, संसाराला विरोध नाही. पण त्यापासून दूर राहणारा निवृत्तीधर्म. व्रतधर्म हे संत काव्याचीही लक्षणे सांगता येतील. संतांच्या शिकवणुकीमुळे वैष्णव, वैदिक धर्माचा आणि सामाजिक जीवनधर्माचा पाया बळकट झाला. त्यांच्या आत्मविश्वासातून एक नवी जीवननिष्ठा जनसामान्यांना प्राप्तही झाली. या सगळयांचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेला साक्षीदार संत म्हणजे संत चोखामेळा आणि त्याचा परिवार होय.

चोखामेळा आणि त्यांचा परिवार म्हणजे पत्नी सोयराबाई, मुलगा कर्ममेळा, मेव्हणा बंका, बहिण निर्मळाबाई. हे सर्वच विठ्ठलभक्तीत रममाण झालेले होते. समाजाच्या भेदाभेदाला चोखोबाला आणि त्यांच्या परिवाराला सामोरे जावे लागले आहे. परंतु ज्ञानेश्वर आणि नामदेवासारखे संत आयुष्यात आल्याने विठ्ठल भक्ती करण्याची मिळालेल्या संधीमुळे आयुष्याला एक वेगळे रूप प्राप्त झाल्याचा चोखोबाचा आनंद त्यांच्या अंभगातून ओसंडून

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – V February 2016

वाहतो तसा तो आपल्याला सोयराबाईंच्या अभंगातूनसुध्दा जाणवतो.

अवघा रंग एक झाला । रंगी रंगला श्रीरंग ।।
मी तू पण गेले वाया । पाहता पंढरीच्या राया ।।

वारकरी पंथातल्या प्रत्येक संत स्त्रियांच्यामागे आपल्याला पुरूषांचे पाठबळ दिसते.जसे महदाईसेमागे चक्रधरस्वामी, मुक्ताईच्यामागे तिची भावंडे, जनाबाई नामदेवांचे महत्त्व सांगतात, बहिणाबाई संत तुकारामांना गुरू मानतात, वेणाबाईना रामदासस्वामींचे पाठबळ होते तसे सोयराबाई चोखांबांवर श्रध्दा ठेवते. ती स्वत:ला चोख्याची महारी असे आपल्या अभंगात म्हणते.चोखोबाबद्दलही ती म्हणते,

चोखा निर्मळ एक रूप । दरूशने हरे ताप ।।
वाचे विठठल नाम छंद । नाही भेद उभयतां।।
तीर्थ उत्तम निर्मळा । वाहे भागीरथी जळा ।।
ऐसी तारक मेहूणपुरी । म्हणे चोख्याची महारी ।।

संताच्या मेळाव्यात चोखोबा हे हीन जातीत जन्माला आले असले तरी संतामध्ये ते श्रेष्ठ संत समजले जात. मला येथे डॉ. राधाकृष्णन यांचे उद्‌गार सांगावेसे वाटतात ते म्हणतात की 'जगाच्या व्यवहारावर दैवी शक्तीची अधिसत्ता आहे. जगाचे नियमन व नियंत्रण करणारा दैवी न्याय सर्व घटनांच्या मुळांशी असतो आणि कुकर्माला त्याचे प्रायश्चित असते तसे चांगले काम करण्याऱ्याला पुरस्कार असतो.' तसे चोखोबाला वारकरी संप्रदायात सर्वांनी सामावून घेतले हे चोखोबासाठी पुरस्कारासारखेच आहे. त्याकाळात स्त्रियांना सुध्दा सामावून घेतले. चोखोबाच्या सहवासात सोयराबाईंची रचना जेमतेम झाली आहे. जसे 'चंदनासंगे बोरीया बाभळी चंदनची ।। चोखोबाच्या संगे तशी सोयराबाई ।'

१३ व्या शतकातील सामाजिक स्थिती आणि त्यात जगायला लागणारे उपेक्षितपण हे चोखोबाच्या अभंगाचे अधिष्ठान आहे. त्याची पत्नी म्हणून सोयराबाईनेही ते स्वीकारले आहे. आपल्या इतिहासात आणि साहित्यात सोयराबाईचा सर्वांगिण परिचय होईल अशी माहिती कुठे मिळत नाही. संत नामदेवांचे काही अभंग आणि सोयराबाईंचे अभंग या एवढयाच सामग्रीवर सोयराबाई आपल्यापर्यंत पोहोचते. पण ज्या चोखोबांच्या सहवासात ती अध्यात्म्याच्या दृष्टीने घडते ते ती आपल्या अभंगातून विट्ठाला सांगते आहे. तिने लिहिलेले अवघे ६२ अभंग तिच्या बद्‌दल आणि तिच्या भक्तीबद्‌दल आपल्याशी संवाद साधतात.

पंढरपुरात कृष्णा महार आणि भीमा नावाची त्याची बायको राहत होते. ही दोघेही विट्‌ठलभक्त होती. त्यांना दोन मुले होती. मुलगा बंका आणि मुलगी सोयरा. संत चोखोबाचे लग्न संत नामदेवांनी या सोयराबाईंशी

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – V February 2016

लावून दिले आणि चोखोबाची बहिण निर्मळाबाईचें बंकाशी लग्न लावून दिले. या चौघांचे सख्य अवघ्या पंढरपुराला माहित होतेत्र संत ज्ञानेश्वर तर पतीचिंया मता । अनुसरोनी पतिव्रता।।

संतांच्या साहित्याने विशिष्ट मानसिकता आणि निग्रह धारण करून तसेच आत्म व लोकप्रबोधन करून आणि सामजिक प्रदूषण कमी करण्याचे काम त्यांनी केले. जणू काही भांगाच्या शेतात यांनी आपल्या काव्याने तुळशीची रोपे लावली'. कोमलता, तीव्रता, आपुलकी आणि आपल्या सर्वस्वाचा त्याग करण्याची त्यांची वृत्ती, समर्पणाचा आगळावेगळा भाव या बाबतीत संत साहित्य हे अधिक पुढारलेले दिसते. कारण त्यांच्या कवितेतील मूल्यविचार आणि मूल्यव्यवस्था ही त्यांच्या समकालीन समाजातून आलेली आहे. त्यांच्या काव्यातून व्यक्त झालेली मूल्ये व्यावहारिक, पारमार्थिक, नैतिक आणि मानवतावादी तसेच ती पारलौकिक स्वरूपाचीही आहेत.

संतांना जी कटुसत्ये सांगावी लागली ती त्या त्या वेळी भक्तांना अप्रिय वाटू लागतात. वेळप्रसंगी अशा माणसांकडून संताचा छळसुध्दा होतो. ( तुका म्हणे तोचि संत । सोसी जगाचे आघात।। ) पण जसजसे वैयक्तिक अनुभव येऊ लागतात तसतसे त्यात जीवनाचे सार, तत्वज्ञान आणि नीतिविषयक ज्ञान असल्याचे पटू लागते. संतांकडे अहंकार नसतो, ते कोणाची निंदा करीत नाही, त्यांची बुद्धी कपटी नसते. त्यांचे प्रत्येक वर्तन हे सामान्य भक्तांसाठी नीतिधर्माचा एक पाठच असतो. संताचे सहज बोलणे हे मानवी हितासाठी केलेला उपदेशच असतो. गाय वासराला जसे सांभाळते तसे ते आपल्याला सांभाळत असतात. संत हे जरी परमेश्वराचे परम भक्त असले तरी त्यांची समाजाकडे पाहण्याची दृष्टी व्यापक आणि विशाल होती, अगदी विठ्ठलमय झालेली असते. त्यामुळे सुख–दु:ख, संकटे यांपासून ही संतमंडळी फार दूर गेलेली असते. या सर्वांची ते कधीच काळजी करत नाहीत. कारण संत तुकाराम म्हणतात की,

सर्वपक्षी हरि साहेसखा झाला । ओल्या अंगणीच्या कल्पलता त्याला ।।
सहज चाली चालतां पायवाटे । चिंतामणीसमान वाटे गोटे ।। तु. गा.२९४४

संतांच्या आराधनेने खूष होऊन श्रीहरी त्यांचा सखा होतो आणि अंगणातल्या वेलीही त्यांच्यासाठी कल्पलता होतात. मार्गाने सहज चालता चालता वाटेत येणारे गोटे हे चिंतामणीसमान होतात. या संतांची भक्ती ही ज्ञानपूर्वकच होती. हे संत अद्वैत अशा ब्रह्मज्ञानाची अनुभूतीच आपल्या अभंगांमधून देतात. या संतांना परमात्मस्वरूपाचे ज्ञान कर्मयोग आणि भक्तीयोगातून होते. भक्ती मार्गात सत्पुरूषांच्या सत्संगाला अधिक महत्व आहे. अशा या सत्पुरूषांच्या मंगलमय विचारांनी व वर्तनांनी भारलेल्या मानसिक वातावरणाचा परिणाम भक्तांवर होतोच आणि त्यांच्या वाणीतून येणारे जीवन आणि नीतीविषयक ज्ञान हे साधकांना मार्गदर्शन करीत राहते. कारण संतांची भक्ती ही केवळ परमेश्वर प्राप्तीची पारमार्थिक भक्ती नाही तर तिच्यात आपल्या सभोवतालच्या लौकिक व्यवहाराचे ज्ञान देखील दडलेले असते. संतांची भक्तीची चळवळ ही केवळ पारमार्थिक अशी मानता येणार नाही तर ती समाजव्यवहारांचे शुद्धिकरण करणारी व माणसा–माणसातील व्यवहारही प्रेमाचे, जिव्हाळयाचे आणि सलोख्याचे

ठेवणारी आहे. तिचे महत्व सार्वत्रिक आणि आजही अनन्यसाधारण आहे हे नाकारता येत नाही.

आपल्याला अनेक जन्मांनंतर आणि आपल्या पूर्व पुण्याईने मनुष्यदेह लाभतो. संत एकनाथ म्हणतात की, 'नरदेह तो दुर्लभच।' या नरदेहामुळेच ईश्वरप्राप्तीचा महालाभ होणार आहे. ईश्वर हा आनंदमय आहे. त्याच्या चिंतनाने सांसारिक सुख–दु:खांच्या पलीकडचे अविनाशी सुख मिळते. संतांनी भक्तीयुक्त कर्तव्यकर्मांचा उपदेश केलेला आहे. हा नरदेह सत्कार्याकरीता आणि परोपकाराकरीता झिजवावा असा उपदेश संतांनी केला आहे. बुद्धिने या देहाच्या व्यापकतेचे ज्ञान करून घ्यावे आणि ज्ञान,भक्ती,कर्म तसेच मन,बुद्धि, शरीर यांचा आपल्या भागवतधर्मात तर समन्वयच साधलेला आहे. या त्रयींचे मानवी आयुष्यातील महत्त्व संतांनी आपल्या अभंगांमधून प्रतिपादन केले आहे. सामान्य लोकांना कळावा म्हणून माणसाचे कल्याण साधणाऱ्या या ब्रह्मविद्येचा सुकाळ संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेतून केला. ब्रह्मविद्येचे पर्यावसान माणसातील मूलभूत एकता कळावी व त्याचे पर्यावसान मानवी समतेत व्हावे हाच एक हेतू या संतांच्या मनात होता. त्यांचे तत्वज्ञान आणि त्यांची भक्ती यांचा समाजाशी एकप्रकारे संबंधच जोडला गेलेला आहे. त्यांचा एकेक अभंग म्हणजे नीतिमूल्यांची कार्यशाळाच आहे. सर्वसामान्यांचे कल्याण साधण्यासाठी, त्यांच्यात धैर्य निर्माण करण्यासाठी संतांनी भक्तीमार्गाच्या माध्यमातून त्यांचा आत्मविश्वास वाढविला.

'क्रांतीकारक जबाबदारीची जाणीव रूजण्यासाठी अध्यात्मिक शक्तीची आवश्यकता आहे याची जाणीव आजच्या युगाला झालेली आहे आणि ती करून देण्यात संत साहित्याचा मोठा वाटा आहे. आपण हे कार्य करीत आहोत अशी जाणीव त्या काळात संतांना कदाचित झालीही नसेल. तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांनी म्हटले आहे की, 'नव्या सामाजिक चळवळीला संतांच्या आदर्शाची आवश्यकता आहे. माणूस वैयक्तिकरित्या पारंपरिक रूढींवर हल्ले करून अखेरीस रूढींचे प्रचंड किल्ले भूईसपाट करू शकतो. माणसे चळवळी उभारून इतिहासाला कलाटणी देवू शकतात. ही जाणीव त्याकाळात संतांना किंवा या काळातील सामान्य माणसांना नव्हती. नाहीतर दृश्य काही वेगळेच दिसले असते. ही जाणीव या नव्या युगाचे वैशिष्टय आहे'. पुराणमतवाद्यांनी मानवी समाजाभोवती उभारलेल्या आणि युगानुयुगे पोसलेल्या भेदभावांच्या तटबंदीला उध्वस्त करण्याचे कार्य त्यांनी केले. सामाजिक सुधारणा आणि राजकीय क्रांती ही दोन्ही ध्येयनिर्मितीच्या त्यागास तयार होऊन अध्यात्मशक्ती जागृत ठेवली.' हे त्यांचे आपल्यावर ऋणच आहे.

संतकाव्याचे महत्त्वाचे लक्षण म्हणजे भक्तीयोग आहे. परमेश्वर निराकार आणि निर्गुण व सर्व प्राणीमात्रांच्या ठायी असतो. त्याची सेवा हीच खरी भक्ती असे संत मानतात आणि आपले अवघे आयुष्य जनकल्याणासाठी खर्च करतात. म्हणून म्हणावेसे वाटते की,

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टविती उपकारे।।
भूतांची दया हे भांडवल संता। आपुली ममता नाही देही ।। तु. गा. १५१०

संतांना लोककल्याणाची चिंता होती. त्यांचा मानवता धर्म माणसाला माणूस जोडून गेला. संतांनी प्रेम,

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – V February 2016

समता, सेवाभावच लोकांमध्ये रूजविला. संकटाच्या व संघर्षाच्या काळातही समाज एकसंध ठेवला. संतांनी तत्काळात या सर्व व्यवस्थेपासून दूर असलेल्या आणि शूद्र गटात असलेल्या समाजगटांना आणि स्त्रियांमध्ये कार्यप्रवृत्तीची निष्ठा निर्माण केली आणि त्यांच्यातील जडत्व दूर केले.

माणसाचा मोठेपणा हा त्याच्या सामाजिक प्रतिष्ठेवर अवलंबून नसून तो त्याच्या वैयक्तिक चारित्र्यावर अवलंबून असतो हे सांगून संतांनी चारित्र्य टिकविण्याऱ्या मूल्यांचा प्रचार आणि प्रसार केला आणि लोकांत नीतिधर्म टिकवून ठेवला. वि. का राजवाडे म्हणतात की, 'संतांना प्रवृत्तीधर्म सांगावयाचा असता तर त्यांनी देशकाल परिस्थितीचे वर्णन केले असते. लोकांमध्ये बिजीगिषीचे संस्कार केले असते किंवा बिजीगिषी निर्माण केली असती. परंतु ऐहिक ऐश्वर्य लाभावे हे संतांचे उद्‌दीष्ट असते तर त्यांनी समाजाला आणखी वेगळा उपदेश केला असता'... पण त्यांनी संसाराची आणि ऐश्वर्याची निंदाच केली. संसारात इतके रमू नये की ज्यामुळे ईश्वराचे स्मरण होणार नाही. त्यांच्यासमोर समाजाची भौतिक प्रगती ही गौण होती. 'मोक्ष' हेच त्यांचे उद्‌दिष्ट होते. त्यांच्या मते ईश्वरभक्ती महत्त्वाचीच असल्याने त्यांनी राजधर्माकडे पाठ फिरविली. त्यांना सत्ता वगैरे मिळवून काही राजकीय स्थित्यंतरे घडवायची नव्हती पण अन्यायात खितपत पडलेल्या माणसांना भक्तीयोगाच्या आधारे धीर देऊन त्यांच्यात शाश्वत मूल्ये निर्माण करावयाची होती व नैतिक व लोकधर्माचे पालनही शिकवायचे होते असे दिसते.

पु. ग. सहस्त्रबुद्धे म्हणतात की 'संतांनी प्रवृत्तीधर्माचा उपदेश फारसा केला नाही. त्यांनी भागवत धर्माचे पुनरूज्जीवन करून समाजाला नैतिक बळ दिले की ज्यामुळे इस्लामी आक्रमणांपासून रक्षण होण्यासाठी त्याचा उपयोग झाला यात संशय नाही.'

श्री संतकुमार टंडण म्हणतात की,'मध्ययुगात हिन्दू धर्माला संकटातून वाचविण्याचे काम संत साहित्याने केले. लोकांना खऱ्या धर्माची जाणीव करून दिली. मानवता, धार्मिकता, उदारता, दया, सहिष्णूता, अहिंसा, सत्य, धैर्य यावर संतांनी भर दिला आणि पलायनापासून दूर नेले, त्यांना आशावाद दिला.'

विष्णूमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद अमंगळ ।।
आइका जी तुम्ही भक्त भागवत। कराल ते हित सत्य करा ।।
कोणाहि जिवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वरपूजनाचें ।।
तुका म्हणे एक देहाचे अवयव। सुख—दु:ख जीव भोग पावे ।। तु.गा. ४६

इ. स. ७व्या शतकात चिनी प्रवासी याने त्याच्या प्रवासवर्णनात भारताचा प्राचीन इतिहास सांगतांना लिहिले आहे की, त्याकाळी महाराष्ट्रात तीन ब्राह्मण, दोन वैश्य, दोन शूद्र राजे होते. आठव्या शतकात सिंधप्रांत मुस्लीमांच्या ताब्यात गेला तो कायमचाच, तो आजही आपल्याकडे नाही. इ.स.१० व्या शतकात हिंदू समाज हा धर्म हे संघटनतत्त्व उराशी ठेऊन लढत होता व विजयी होत होता. पुढच्या काळात धर्मतत्त्व सुटले आणि विकृत झाले, लोप पावले. संघटन तत्त्व विस्कटले नि विघटन सुरू झाले. विषमता, निवृत्तीवाद विघटनाला कारणीभूत ठरले.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – V February 2016

आर्यांनी समानतत्त्वावर हिंदूंची उभारणी करण्याचे ठरविले होते. (ऋ. १०–१९१–३). परंतु पुढे ते तसे टिकले नाही. वेदांना अपेक्षित समानता (ऋ. १०–५३) पुढच्या शास्त्रवेत्त्यांना त्याचा विसर पडला आणि विघटन होत राहिले. आपल्या एकरूपतेचा धर्माच्या ऐक्याचा खरा भंग झाला तो मुस्लीम आक्रमणामुळे आणि धर्मांतराचा प्रारंभ बळजबरी झाला.

आपल्या भारताचा मध्ययुगातील इतिहास पाहता व त्यातील संतांचा दृष्टिकोन पाहता असे म्हणता येते की, संतांनी प्रवृत्तीधर्माचा उपदेश फारसा केला नाही. त्यांनी निवृत्तीधर्माचा प्रसार अधिक केला. कारण ११व्या शतकात गझनीचा सुलतान मुहम्मदच्या स्वाऱ्या झाल्या. त्याने १७ आक्रमणे केली. त्यात त्याचा एकही पराभव झाला नाही. कारण काही राजांनी त्याला अल्प प्रतिकार केला तर काही राजांनी तर तसा कोणताही प्रतिकार केला नाही आणि त्याला सतत यशच मिळत गेले. १५० वर्षे आपण पारतंत्र्यात घालविली. मुस्लीम सत्तेचा पाया याचवेळी आणि याच शतकात घातला गेला. मधल्या काळात दिल्लीच्या मुस्लीम असलेल्या दुबळया सुलतानांमुळे मधला ३० वर्षाचा काळ हिंदूंना मिळाला आणि मग देवगिरीचे यादव, हळेबीडचे होयसळ, मदुरेचे पांडय, वरंगळचे काकतीय यांची राज्ये स्थापली गेली. त्यांना ३०० वर्षाचा अवसर मिळाला पण १२९४ नंतर अल्लाउद्दीन खिलजीने पुन्हा स्वाऱ्या केल्या आणि पुढच्या दोन दशकात गेलेली सारी राज्ये मिळविली. पुन्हा पारतंत्र्याचे जीवन वाटयास आले. ते जवळ जवळ १६व्या शतकापर्यंत होते. काहींच्या मते संतांनी केलेल्या निवृत्तीधर्म प्रचाराने महाराष्ट्रीयन समाज पारतंत्र्यात खितपत पडला. इहविन्मुख झाला पण केवळ संत रामदासांनी मात्र समाजाला 'प्रपंच करावा नेटका' असे सांगून प्रवृत्तीधर्म शिकवला. पराक्रम, स्वराज्य, यावाचून मोक्ष धर्माला अर्थ नाही हा उपदेशही केला. या महाराष्ट्रात स्वराज्य स्थापनेची प्रचंड चळवळ शिवरायांच्या आणि त्यांच्या ध्येयासोबत राहून उभारली.

या काळात शिवरायांनी संतांनी घडविलेल्या आणि सक्षम अशी मानसिकता असलेल्या जनतेला हाताशी धरून, त्यांना स्वातंत्र्याची जाणीव करून देवून त्यांच्यात स्वातंत्र्यांची ज्योत पेटविली. शिवरायांनी व्यक्तिगत धर्माला समाजधर्म बनविले आणि नव्या क्रांतीने जन्म घेतला.

१८ व्या शतकात आणखी एक स्थित्यंतर झाले. इंग्रजांचे पगारी संत म्हणजे मिशनरी लोक भारतात वास्तव्य करून होते. या मिशनऱ्यांनी स्वार्थापोटी आणि त्यांच्या धर्मप्रसारासाठी भारतात मिशनरी स्कूल्स आणि दवाखाने काढलेत. लोकसत्तेतून धर्म प्रसार हे मिशनऱ्यांचे प्रधान लक्ष्य होते. औषध हे बायबलाचे वाहन असे मिशनरी म्हणतात. याप्रमाणे आपले संताचे अभंग आणि कीर्तन हे त्यांचे लोकप्रबोधनाचे वाहनच होते.

डॉ. वेरीयर एडविन म्हणतात की, 'मिशनऱ्यांनी जे धर्मांतरांचे राष्ट्रद्रोही कार्य चालविले आहे त्याला भारतीयांना सावध होऊन वेळीच आळा घातला पाहिजे नाहीतर सर्व आदिवासी जनता अराष्ट्रीय होऊन भारताच्या कुशीत एक कटयार घुसेल.' या मिशनरी संतांनी त्यांना वाटणारे देशप्रेम आणि आपल्याला वाटणारे त्यांचे स्वार्थी आणि भारतातील हिंदू मुस्लीमांमध्ये फूट पाडणारे काम वाढविले.

प्रा. हरिराम गुप्ता म्हणतात की १८ व्या शतकात हिंदूंचे ऐक्य हा भ्रम होता तर मुस्लीमांचे ऐक्य हे सत्य होते. के. के. जॉन कोक यांनीही कबूल केले होते की मिशनऱ्यांना आणि ब्रिटीश अधिकाऱ्यांना हिंदुस्थानात हिंदूत फुट पाडणे, एकी होवू न देणे, फोडा, झोडा आणि तोडा व ख्रिश्चन धर्मांशी जोडा या हेतूनेच भारतात पाठविले जाई.भारतात जातिभेद सुरू केला पण भारतीय संतांनी मात्र या जनतेला नीतिविषयक, धर्म,सत्य, अहिंसा, सहिष्णूता वगैरे मूल्य शिकवून भेदाभेदांपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी बळजबरी सुरू केलेल्या धर्मांतराला तसा संतांचा विरोधच होता. मुस्लीम असूनही विठ्ठलाचे अनेक जण भक्त होते. त्यांनीही समाजाला हिंसेपासून,भेदाभेदांपासून दूर ठेवले. अठरापगड जाती असलेल्यांना एकत्र बांधून ठेवले. हे आपल्याला मान्य करावे लागेल. संत आणि त्यांचे साहित्य नीतिधर्माचे शिक्षण देत होते म्हणून परसत्तेतही जगणे सुलभ झाले.

रामकृष्ण मिशन ही धर्मांतराला विरोध करणारी संघटना स्वामी विवेकानंदांनी स्थापन केली. हिंन्दू समाजाची नष्ट झालेली अस्मिता जागृत करणे, जात, पंथ यांना नव्हे तर व्यक्तिला प्रतिष्ठा प्राप्त करून देणे हे सूत्र या शाखा भारत नि भारताबाहेरही कार्यात उतरवत होत्या. १९३७ साली केरळ हिन्दू मिशन, मध्यप्रदेशातील कल्याण आश्रम हे परधर्म स्वीकारलेल्या व्यक्तिंना स्वधर्मात घेण्यासाठी कार्य करीत होत्या. १९२० साली मसुराश्रम मसूर येथे स्थापना झालेली होती. महाराष्ट्रातील इतर धर्मात गेलेल्यांना शुध्द करून हिंदू धर्मात घेतले. या आणि अशा अनेक संस्थानी समाजसेवा सुरू केल्या होत्या.

**निष्कर्ष**

- संतांसमोर समाजाची भौतिक प्रगती ही गौण होती. 'मोक्ष' हेच त्यांचे उद्दिष्ट होते.
- संतांना सत्ता वगैरे मिळवून काही राजकीय स्थित्यंतरे घडवायची नव्हती पण अन्यायात खितपत पडलेल्या माणसांना भक्तीयोगाच्या आधारे धीर देऊन त्यांच्यात शाश्वत मूल्ये निर्माण करावयाची होती व नैतिक व लोकधर्माचे पालनही शिकवायचे होते असे दिसते.
- संतांपुढं ईश्वरभक्ती महत्त्वाचीच असल्याने त्यांनी राजधर्माकडे पाठ फिरविली
- भारतात जातिभेद सुरू केला पण भारतीय संतांनी मात्र या जनतेला नीतिविषयक, धर्म, सत्य, अहिंसा, सहिष्णूता वगैरे मूल्य शिकवून भेदाभेदांपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला.
- बळजबरी सुरू केलेल्या धर्मांतराला तसा संतांचा विरोधच होता
- अठरापगड जाती असलेल्या एकत्र बांधून ठेवण्याचे काम संत साहित्याने केले.
- मध्ययुगातील काही संतांचे दृष्टिकोन पाहता असे म्हणता येते की, संतांनी प्रवृत्तीधर्माचा उपदेश फारसा केला नाही. त्यांनी निवृत्तीधर्माचा प्रसार अधिक केला.
- १८ व्या शतकात हिंदूंचे ऐक्य हा भ्रम होता तर मुस्लीमांचे ऐक्य हे सत्य होते.

- 'मध्ययुगात हिन्दू धर्माला संकटातून वाचविण्याचे काम संत साहित्याने केले. लोकांना खऱ्या धर्माची जाणीव करून दिली. मानवता, धार्मिकता, उदारता, दया, सहिष्णूता, अहिंसा, सत्य, धैर्य यावर संतांनी भर दिला आणि पलायनापासून दूर नेले, त्यांना आशावाद दिला.'
- 'नव्या सामाजिक चळवळीला संतांच्या आदर्शाची आवश्यकता आहे.

भारतातील पहिला आधुनिक संत म्हणजे राजाराम मोहनरॉय होत. असे म्हणावेसे वाटते. संतांनी राजधर्माकडे पाठ फिरविली. 'विश्वातील घटनांच्या कार्यकारणभावांचे रहस्य जाणून घेण्याच्या जिज्ञासेतूनच विकसित झालेले ज्ञान, विज्ञानं आणि संतांचे अध्यात्म्य ज्ञान यात विरोध नाही पण विज्ञानाने जे जे शोध लावले, नवी साधने दिली व त्याचा उपयोग मानवसंहारासाठी न करता तो मानव कल्याणासाठी व्हावा हीच अपेक्षा आपली आणि संतसाहित्याची आहे. आणि असे म्हणतात की, 'अल्पजन समाजातील वाङ्.मय हे सोज्वळता आणि सात्विकतेला अधिक मूल्य प्रदान करते.' 'संतांची 'नाम ही भक्ती । नाम हीच शक्ती। नाम सुखशांतीचे साधन आणि नाम तिथे राहो माझे प्राण'।। आवडीने अनंत आळवावा ,सगुणोपासना करावी,परनिंदा टाळावी, नम्रता अंगी बाळगावी, परमार्थ हीच तीर्थयात्रा समजावी. अभिमान शत्रू मानावा, निस्वार्थ जीवन जगावे, संतसंग करावा, चित्तशुध्द ठेवावे. हे सारे आपल्याला मिळते ते फक्त संतांनी निर्माण केलेल्या विद्यापीठातच! म्हणूनच मी म्हणते,

यासाठीच मी केला हा खटाटोप । अभंगाकडे मन वळवाया ।।
उजळावे जीवन आपले । माइया या ओळी गोड व्हाव्या ।।

संदर्भ : –

- भारतीय संस्कृती कोश , खंड ९ व १०
- भारतीय विश्वकोश
- साक्षात्कारी संत तुकाराम, डॉ. शं.दा. पेंडसे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे,
- समर्थ रामदास स्वामींचे प्रपंच विज्ञान, श्री. म. माटे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे.
- ज्ञानेश्वरी
- पौराणिक भागवत धर्म
- वैदिक वाङ्मयातील भागवत धर्माचा इतिहास, डॉ. शं.दा. पेंडसे, व्हीनस प्रकाशन पुणे,
- मराठी काव्यातील स्त्रीचित्रण– डॉ. वेदश्री विजय थिगळे
- संत तुकाराम गाथा

- संत कवयित्री जनाबाई – डॉ. रेखा जगनाळे,
- मराठी संतांच्या विराण्या –प्र. न. जोशी
- संत जनाबाईंचे अभंग – डॉ. शिवाजीराव मोहिते
- वाङ्.मयीन संस्कृती आणि सामाजिक वास्तव – विलास सारंग
- पाच भक्ती संप्रदाय
- महदंबेचे धवळे – डॉ. सुहासिनी इर्लेकर
- विकीपिडिया
- प्राचीन मराठी वाङ्.मयाचा इतिहास – डॉ. प्र. न. जोशी
- प्राचीन मराठी वाङ्.मयाचा इतिहास – ल.रा. नसिराबादकर
- प्राचीन मराठी वाङ्.मयाचा इतिहास – अ. ना. देशपांडे